MHTH070029462024

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ७१८/२०२४ मधील निशाणी क्र. १ वरील आदेश

१) अर्जदार यांनी सदरचा अर्ज वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी दिलेला आहे. अर्जदार यांनी सांगितलेप्रमाणे, उल्हासनगर येथील रहिवासी पुष्पा श्रीनिवास मेकल यांचे दि. १३.०३.२०२४ रोजी कल्याण येथे निधन झाले. मयत यांचे पती श्रीनिवास मेकल यांचे दि. ०१.०७.२०१२ रोजी निधन झालेले आहे. अर्जदार यांच्या म्हणण्याप्रमाणे, मयत पुष्पा श्रीनिवास मेकल यांना खालीलप्रमाणे वारस आहेत.

१) मोहीनी श्रीनिवास मेकल-मुलगी-अर्जदार

२) अर्जदार यांच्या म्हणण्याप्रमाणे मयत पुष्पा श्रीनिवास मेकल यांच्या नावे मौजे उल्हासनगर, जि. ठाणे येथील खालील मालमत्तेला नाव लावण्यासाठी त्यांना वारस प्रमाणपत्र हवे आहे.

मौजे उल्हासनगर, ता. कल्याण, जि. ठाणे येथील उल्हासनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील हाउस नं. २८७ (पार्ट), नविन वॉर्ड नं. ३७, खाते नं. ४२४ (पार्ट) जुना वॉर्ड नं. ३७८ खाते नं. ४५३ (पार्ट), बरॅक नं. ११०२ च्या समोर, ओ. टी. सेक्शन रोड, उल्हासनगर –०३, ठाणे. ४२१००२, एकूण क्षेत्रफळ ५४० चौ. फूट अशा वर्णनाची सदनिका आहे.

३) अर्जदाराने अर्ज शाबीती कामी अर्जदारांनी स्वत:चे पुरावा प्रतिज्ञापत्र अनुक्रमे नि. १० वर दिले व पुरावा म्हणुन खालील कागदपत्रांवर आपली भिस्त ठेवली आहे.

१. मयत श्रीनिवास मेकल व पुष्पा श्रीनिवास मेकल यांची मृत्यू प्रमाणपत्रे-नि.क्र. १३ व १४

२. उल्हासनगर महानगरपालिकेचे कराचे देयक भरल्याची पावती-नि.क्र. १५

३. विवाह प्रमाणपत्र-नि.क्र. ११

४. रेशन कार्ड-नि.क्र. १२

५. लाईट बिल-नि.क्र. १६

६. मालमत्तेचा करारनामा कलन २ दस्त क्र. ३५४५/२००७- नि.क्र. १९

७. मालमत्तेचे मूल्यांकन पत्रक-नि. क्र.२२

८. जाहीरनामा- नि. क्र. ६

९. दैनिक 'ग्लोबल टाईम्स' दि. ३१.०८.२०२४ रोजीची जाहीर नोटीस- नि. क्र. ९

४) याठिकाणी नमुद करण्यात येत आहे की, विहित मुदतीत इतर कोणीही अर्जदाराच्या अर्जाला आक्षेप घेतलेला नाही. अर्जदारांनी दाखल केलेले पुरावे, कागदपत्रे व शपथपत्र पाहता सद्यस्थितीत अर्जदार हेच मयत पुष्पा श्रीनिवास मेकल यांचे वारस आहेत, हे मान्य करण्यात येत आहे. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

१. अर्जदार हे मयत पुष्पा श्रीनिवास मेकल यांच्या वर नमूद मालमत्तेकरिता वारस आहेत असे जाहीर करण्यात येते.

२. अर्जदार मोहीनी श्रीनिवास मेकल यांच्या नावे वारस प्रमाणपत्र देण्यात येते.

३. अर्जदार यांनी मालमत्तेच्या मूल्यांकनावर योग्य ते न्यायालयीन शुल्क दयावे.

४. दिवाणी नियमावलीच्या प्रकरण १४ परिच्छेद ३१२ प्रमाणे वारस प्रमाणपत्रावर नोंद घेण्यात यावी.

Digitally signed by PRASHANT PRABHAKAR KULKARNI
Date: 2026.07.17 13:18:36 +0530

दिनांक - १७.०७.२०२६
कल्याण

( पी. पी. कुलकर्णी )
सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
कल्याण, जि. ठाणे